# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमीटेड

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)

CIN : U45200 MH 1974 SGC 017206

एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६

Email: md@fdcm.nic.in, gm.hqnag12@gmail.com

फोन नं.०७१२-२८११९६२,२८११९६३


## फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड सेवा परीक्षा- २०१८

### पुर्व परिक्षा व मुख्य परिक्षेचे सुधारीत वेळापत्रक

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th><th>दिनांक व वेळ</th></tr>
<tr><td>१</td><td>ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची तारीख</td><td>२१.२.२०१८</td></tr>
<tr><td>२</td><td>ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख</td><td>१६.३.२०१८</td></tr>
<tr><td>३</td><td>ऑनलाईन ओळखपत्राचे वाटप करणे</td><td>दिनांक १९.३.२०१८ पासुन</td></tr>
<tr><td>४</td><td>पुर्वपरिक्षा (CBT) computer base test</td><td>दिनांक २६.३.२०१८<br>वेळ: सकाळी १२.३० ते ०१.३० पर्यंत</td></tr>
<tr><td>५</td><td>उमेदवारांच्या आक्षेपांचे गठीत समितीद्वारे निराकरण करणे</td><td>दिनांक २७.३.२०१८ ते २८.३.२०१८</td></tr>
<tr><td>६</td><td>पुर्वपरीक्षेचा निकाल महाऑनलाईन व एफडीसीएम लि.च्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रात जाहिर करणे</td><td>दिनांक ०२.०४.२०१८</td></tr>
<tr><td>७</td><td>फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड सेवा परीक्षा- २०१८ - मुख्य परिक्षेकरीता पात्र उमेदवारांकडुन (ऑनलाईनद्वारे) परिक्षा शुल्क भरणे</td><td>दिनांक ०४.२०१८ ते ८.४.२०१८</td></tr>
<tr><td>८</td><td>मुख्य परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने ओळखपत्रांचे वाटप करणे</td><td>दिनांक ०९.०४.२०१८ पासुन</td></tr>
<tr><td>९</td><td>मुख्य परिक्षा (CBT) computer base test</td><td><table>
<tr><th>पेपर क्र.</th><th>दिनांक</th><th>वेळ</th><th>स्थळ</th></tr>
<tr><td>१</td><td>१६.४.२०१८</td><td>सकाळी ११.०० वा.पासुन १२.०० पर्यंत</td><td>नागपूर</td></tr>
<tr><td>२</td><td>१६.४.२०१८</td><td>दुपारी ०२.०० वा.पासुन ०३.०० पर्यंत</td><td>नागपूर</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१०</td><td>उमेदवारांच्या आक्षेपांचे गठीत समितीद्वारे निराकरण करणे</td><td>दिनांक १७.४.२०१८<br>सकाळी ११.०० ते १६.०० वाजेपर्यंत</td></tr>
<tr><td>११</td><td>मुख्य परीक्षेचा निकाल महाऑनलाईन व एफडीसीएम लि.च्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रात जाहिर करणे</td><td>दिनांक १९.४.२०१८</td></tr>
<tr><td>१२</td><td>मुख्य परीक्षेनंतर मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांचे Document verification व मुलाखती</td><td>दिनांक २६.४.२०१८ ते दिनांक २८.४.२०१८<br>(सकाळी ९.०० वाजेपासुन)</td></tr>
<tr><td>१३</td><td>मुलाखती नंतरउमेदवारांकरीता चालणे पात्रता परिक्षा व शारीरीक क्षमता तपासणी पात्रता ठरविणे (पुरुष उमेदवार २५ कि.मी. व महिला उमेदवार १६ कि.मी.४ तासात चालणे व शारीरीक मोजमापे घेणे)</td><td>दिनांक २९.४.२०१८<br>(सकाळी ५.०० वाजेपासुन)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १४ | परिक्षेचा अंतिम निकाल संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिर करणे (List of selected and waiting candidates) | दिनांक २.५.२०१८ |
| १५ | अंतिम निकालाच्या आधारे सहाय्यक व्यवस्थापक व वनपरीक्षेत्र अधिकारी या पदावर नियुक्तीकरीता निवड केलेल्या उमेदवारांची वैद्यकीय मंडळ शासकीय रुग्णालय/शल्य चिकीत्सक/ नागपुर यांचेकडुन शारीरीकदृष्टया पात्र असल्याची तपासणी करणे | संभावित तारखा-<br>दिनांक ४.५.२०१८ ते ६.५.२०१८ किंवा वैद्यकीय मंडळ/शल्य चिकीत्सकाकडून निर्धारीत केलेल्या तारखेस |
| १६ | अ) सहाय्यक व्यवस्थापक व वनपरीक्षेत्र अधिकारी या पदावर नियुक्तीकरीता निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीपुर्व अनुक्रमे २ वर्ष व १८ महिन्याचे प्रशिक्षणाकरीता जाण्यापूर्वी बंधपत्र व करारनामा एफडीसीएम लि.नागपूर कडे सादर करणे | दिनांक ९.५.२०१८ ते १३.५.२०१८ |
| | ब) बंधपत्र व करारनामा एफडीसीएम लि.कडे सादर केलेल्या उमेदवारांचे सक्षम प्राधिका-याकडुन शिफारस पत्र जारी करणे | दिनांक ९.५.२०१८ ते १३.५.२०१८ |
| १९ | नियुक्ती करीता निवड केलेल्या उमेदवारांना निश्चित केलेल्या केंद्र शासनाच्या प्रशिक्षण संस्थेत नियुक्तीपूर्व प्रशिक्षणाकरीता उपस्थित होणे | संभावित तारीख १६.५.२०१८ |

१ **<u>उमेदवारास परीक्षा संबधी सूचना</u>**

(1) परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

(2) परीक्षेत येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

(3) सकाळी ११.०० वाजता परीक्षा कक्षात हजर राहणे अनिवार्य आहे. सकाळी ११.०० ते १२.१५ हा कालावधी ओळखपत्र तपासणे, हजेरी पटावर स्वाक्षरी घेणे, मशीन सुरु करणे व आवश्यक सूचना देणे यासाठी राहील.

(4) परीक्षेचा कालावधी ०१ तासाचा असेल व त्याप्रमाणे प्रत्यक्ष परीक्षा दुपारी १२.३० वाजता सुरु होईल. दुपारी १२.१५ वाजल्यानंतर आलेल्या उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

(5) प्रवेश प्रमाणपत्रावर दिलेल्या तसेच परीक्षेच्या वेळी दिलेल्या सूचनांचे अंत्यंत काळजी पूर्वक अनुपालन करावे. तसेच केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, समवेक्षक आदींकडून तसेच कार्यालयाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

(6) परीक्षा सुरु झाल्यानंतर ते परीक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी परीक्षा कक्षा बाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(7) परीक्षा कक्षात परवानगी असलेले साहित्य :- परीक्षा प्रवेश प्रमाणपत्र, ओळखपत्र व ओळखपत्राची सत्यप्रत

(8) परीक्षेच्या वेळी परिगणकासारख्या (CALCULATOR) कोणत्याही साधनांचा उपयोग करण्यास सक्त मनाई आहे. तसेच कोणतीही पुस्तके, वह्या, बॅग्स, अनधिकृत वस्तू इ. साहित्य परीक्षा कक्षात स्वत: जवळ ठेवण्यास सक्त मनाई आहे. डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन इ. सारखी दूरसंचार साधने परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास व स्वतः जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणले तर उमेदवारांना ते परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाज्याबाहेरच ठेवावे लागेल. तसेच असे साहित्य ठेवण्याची जबाबदारी कार्यालयाची असणार नाही. परीक्षा केंद्राच्या आवाराच्या मुख्य दरवाजाच्या आत असे साहित्य आणल्यास उमेदवाराला परीक्षेतून बाद ठरविण्यात येईल.

(9) उमेदवाराने परीक्षेच्या वेळी हजेरी पटावरील नोंदी काळजीपूर्वक वाचून शेवटच्या रकान्यात संपूर्ण स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. हजेरी पटावर केलेली स्वाक्षरी परीक्षेच्या अर्जावर केलेल्या स्वक्षरीशी जुळणारी असावी.

(10) सदरची परीक्षा ऑनलाईन (Online) असल्यामुळे Screen वर येणाऱ्या प्रश्न पत्रिकेच्या विहित जागी बैठक क्रमांक अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे.

बैठक क्रमांक नमूद करण्यात त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील व या संदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

(11) सदर परीक्षा स्क्रिनिग टेस्ट (Screening Test) हि बहुपर्यायी उत्तरे असलेल्या वस्तुनिष्ठ स्वरुपाची आणि संगणीकृत (online) असेल. संबंधित प्रश्नावली उमेदवाराला online दिसेल. प्रश्नावली मधील सर्व प्रश्न अनिवार्य असतील. प्रश्नाच्या उत्तरांचा योग्य पर्याय Online Mark करावा लागेल. प्रश्नावली सोडवून पूर्ण झाल्यावर Submit या Option वर Click करावे.त्यानंतर दिलेल्या उत्तरामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. परीक्षा कालावधी पूर्ण होण्यास पाच मिनिटे असताना इशारा घंटा दिली जाईल.

(12) परीक्षे दरम्यान Online प्रणाली योग्य कार्य करत नसल्यास व काही अडचणी आल्यास उमेदवारांनी ती बाब संबंधित पर्यवेक्षक यांना तातडीने सांगावी.

(13) परीक्षेस प्रवेश दिला म्हणून कार्यालयाने उमेदवारी स्वीकारली असा अर्थ होत नाही. कोणत्याही टप्प्यावर अपात्र असल्याचे आढळून आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

(14) प्रश्न पत्रिकेत व उत्तर पत्रिकेत त्रुटी आढळल्यास याबाबतचे संपूर्ण तपशीलासह निवेदन वेबसाईटवर लॉगींन करून My account मधील objetion या लिंकवर दिनांक 17.3.2018 ते 18.3.2018 पर्यंत सादर करावे.

(15) ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे सादर केलेली माहिती या प्रवेश पत्रावर दिलेली आहे. त्यामध्ये चूक/विसंगती आढळल्यास त्या संबंधीचे लेखी निवेदन उमेदवाराने mr.Support@mahaonline.gov.in या इमेल वर स्वतःच्या तपशीलासह दिनांक १३.३.२०१८ च्या आत सादर करावे.

(16) प्रवेश पत्राच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधी उमेदवाराची राहील. अन्य व्यक्तीकडून कोणत्याही कारणाकरिता सदर प्रवेश पत्राचा दुरुपयोग केला गेला तर त्या व्यक्ती कडून मदत घेतली नसल्याचे सिद्ध करण्याची जबाबदारी उमदेवारावर राहील.

(17) परीक्षे संदर्भात Maha Online कडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांबाबत अवलोकन करणे उमेदवाराच्या हिताचे राहील.

## २. उमेदवारांना सर्वसाधारण सूचना :

### अर्ज, अर्हता, सर्वसाधारण पात्रता, वयोमर्यादा, इत्यादिबाबत

**(१)** अर्ज स्विकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांक व वेळेनंतर इतर पध्दतीने प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ऑन लाईन व्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने अर्ज एफडीसीएम लिमिटेडकडे पाठविल्यास असे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत व त्याबद्दल एफडीसीएम लि. जबाबदार असणार नाही.

**(२)** महाराष्ट्र शासन/केंद्र शासन/स्थानिक संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी अर्ज स्विकारण्यासाठी एफडीसीएम लिमिटेडने विहित केलेला अंतिम दिनांक इत्यादि तपशील आपल्या विभाग / कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापुर्वी तसे एफडीसीएम लिमिटेडला परस्पर कळविण्याची विनंती आपल्या विभाग/ कार्यालय प्रमुखांना करावी. अर्ज विचारात घेतला जाण्यास हरकत नसल्यास एफडीसीएम लिमिटेडला तसे कळविण्याची आवश्यकता नाही हेही त्यांना कळवावे.

**(३)** लागू असलेल्या, सेवा शर्तीनुसार स्वत:च्या विभाग / कार्यालय प्रमुखांमार्फत अर्ज पाठविणे आवश्यक असणा-या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विहीत कालावधीत अर्ज सादर केल्यास त्यांच्या अर्जाचा तात्पुरता विचार केला जाईल. तथापि, उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ नुसार उमेदवारांने कार्यवाही करणे आवश्यक राहील.

**(४)** विहित शुल्कासह अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये बदल करण्याबाबत करण्यात आलेली विनंती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

**(५)** विहित पध्दतीने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणेची/शुल्क भरण्याची संपूर्ण कार्यवाही एफडीसीएम लिमिटेडने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

**(६)** **उमेदवारांना इशारा :-** अर्जात हेतूपरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा मुलाखतीच्या वेळी दाखल केलेल्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, एफडीसीएम लिमिटेडने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन न करणे, परिक्षा कक्षातील गैरवर्तन, परिक्षेच्या वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे या सारखे अथवा परिक्षा कक्षाच्या बाहेर अथवा परिक्षेनंतरही तसेच अन्य कोणतेही गैरप्रकार करणा-या उमेदवारांचे गुण कमी करणे विशिष्ट किंवा सर्व परिक्षांना वा निवडीना अनर्ह ठरविणे, काळया यादीत नाव समाविष्ट करणे व प्रतिरोधीत करणे (Debar) यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाच्या अनुषंगाने योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार एफडीसीएम लिमिटेडला असतील आणि उमेदवार शासकीय सेवेत असेल तर त्याला विभाग प्रमुखाकडून /शासनाकडून शासकीय सेवेतून बडतर्फ केले जाण्याची शक्यता आहे. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल आणि / किंवा इतर योग्य अशा शिक्षेला पात्र ठरेल.

**(७)** **परिक्षेतील गैरप्रकार करणा-यांना इशारा :-** एफडीसीएम लिमिटेड तर्फे घेण्यात येणा-या प्रस्तुत परिक्षेत अथवा परिक्षेनंतरही कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करणे जसे बनावट प्रश्नपत्रिकांची विक्री करणे अथवा परिक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करणे, दुस-या उमेदवारांकडून मदत घेणे, दुस-या उमेदवारास मदत करणे अथवा कोणत्याही प्रकारे आपली ओळख पटेल अशी कृती करणे, तसा प्रयत्न करणा-या उमेदवारांवर तसेच उमेदवार नसलेल्या पण गैरप्रकार करणा-या व्यक्तीवर महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टीसेस अॅक्ट युनिव्हर्सिटी, बोर्ड अॅन्ड आदर स्पेसिफाईड एक्झामिनेशन्स अॅक्ट १९८२ खाली आणि प्रचलित कायदा व नियमानुसार कारवाई करण्यात येईल. या व्यतिरिक्त संबंधित व्यक्तीस सदर परिक्षेसाठी अथवा एफडीसीएम लिमिटेडमार्फत घेण्यात येणा-या सर्व परिक्षा वा निवडीसाठी कायमस्वरुपी प्रतिरोधित (Debar) सुध्दा करण्यात येईल. याचीही नोंद घ्यावी. उमेदवार शासन सेवेत असेल तर त्याला विभाग प्रमुखाकडून / शासनाकडून शासकीय सेवेतून बडतर्फ केले जाण्याची शक्यता आहे.

**(८)** अर्जामध्ये केलेला दावा व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द होउ शकते.

**(९)** सहाय्यक व्यवस्थापक / वनक्षेत्रपाल पदाच्या परिक्षेच्या जाहिरातीत दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रकिया पूर्ण होईल.

**(१०)** विविध संस्थाकडून एकाहून अधिक सेवेच्या / पदाच्या अथवा इतर परिक्षा एकाच दिवशी आयोजित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एफडीसीएम लि.मधील सहाय्यक व्यवस्थापक/वनक्षेत्रपाल पदाकरिता अर्ज करतेवेळी याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करण्यात येणार नाही.

**(११)** बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**(१२)** वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., व इ.मा.व. प्रवर्गातील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडतात म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न ६.०० लाखांपेक्षा अधिक आहे. अशा उमेदवारांनी

त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

**(१३)** अमागास महिलांसाठी आरक्षीत असलेल्या पदाकरिता अर्ज करणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., व इ.मा.व. प्रवर्गातील महिला उमेदवारांपैकी जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडतात म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न ६.०० लाखांपेक्षा अधिक आहे. अशा महिला उमेदवारांनी अमागास उमेदवारांप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

**(१४)** एफडीसीएम लि.,यांना प्राप्त झालेले प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत करण्यात येणार नाही.

**३.० <u>मुलाखतीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे</u> :-**

**मु**लाखतीच्या वेळी उमेदवारांनी पात्रतेसंदर्भात खालील मुळ प्रमाणपत्रे व त्याची साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक आहे:-

**(अ) वयाचा पुरावा :-**

**(१)** मॅट्रिकचे प्रमाणपत्र किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा सोबतच्या **परिशिष्ट -एक** मध्ये दिलेल्या विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले वयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रमाणपत्राच्या ऐवजी शाळा सोडल्याचा दाखला अथवा शपथपत्र अथवा अन्य कोणतेही प्रमाणपत्र स्वीकारण्यात येणार नाही.
**(२)** शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांना उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्याच्या सेवाअभिलेखात नोंदविलेला त्यांचा जन्म दिनांक नमूद करणा-या त्या सेवा अभिलेखातील प्रमाणित उता-याची प्रत सादर करता येईल.
**(३)** इतर कोणत्याही प्रकारचा पुरावा स्वीकारण्यात येणार नाही.

(ब) **<u>शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा :-</u>**

**(१)** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परिक्षेच्या किंवा एखाद्या तत्सम परीक्षेच्या बाबतीत, संबंधित मंडळाचे प्रमाणपत्राऐवजी शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र स्वीकारण्यात येणार नाही.
**(२)** उत्तीर्ण केलेल्या पदवी परीक्षांच्या किंवा पदविका परीक्षाच्या बाबतीत प्रत्येक परीक्षेचे विद्यापिठाने / सक्षम प्राधिका-याने ओपचारीकरित्या प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करावे.
**(३)** पदवी परीक्षा ही पात्रता सहाय्यक व्यवस्थापक/वनक्षेत्रपाल पदास आवश्यक असल्याने माजी सैनिकांनी पदवी उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.
**(४)** गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

**(क) <u>मागासवर्गीय उमेदवार असल्याबद्दलचा पुरावा</u> :-**

**(१)** राज्य शासनाने भरती करण्याच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जमाती म्हणून मान्यता दिलेल्या जमातीपैकी असल्याचा दावा करणा-या उमेदवारांनी तसेच अनुसूचित जातीचा दावा सांगणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - दोन** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची एक प्रत सादर करावी.
**(२)** अनुसूचित जातीतील धर्मांतरित बौध्द असल्याचा दावा सांगणा-या अमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - तीन** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.
**(३)** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, व इतर मागास वर्ग म्हणून मान्यता दिलेल्या जाती / जमातीपैकी एखाद्या गटाचा असल्याचा दावा करण-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - चार** मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यातील जातीविषयक प्रमाणपत्राची प्रत सादर करावी.
**(४)** उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याचे विहित प्रमाणपत्र विज्ञापन ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेली असेल, त्यापूर्वीच्या वित्तीय वर्षातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याआधीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(५) विवाहित स्त्रियांच्या बाबतीत त्यांनी पूर्वाश्रमीच्या नावाने जातीचे व क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(६) विशेष कार्यकारी अधिकारी किंवा मानसेवी दंडाधिकारी असलेल्या अथवा सक्षम प्राधिकारी नसलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने दिलेले जातीचे अथवा क्रिमी लेअरचे प्रमाणपत्र कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही.

**(ड) मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा :-**

(१) माध्यमिक/शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक किंवा विद्यापिठीय उच्च परिक्षा संबंधित भाषा विषय घेउुन उत्तीर्ण झाल्याचे दर्शविणारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाचे किंवा संविधिक विद्यापिठाचे प्रमाणपत्र.

(२) उमेदवार उत्तम रितीने मराठी भाषा वाचू, लिहू आणि बोलू शकता अशा आशयाचे संविधिक विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील किंवा पदव्युत्तर संस्थेतील भाषा शिक्षकाने दिलेले आणि महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यानी प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र.

**(इ) माजी सेनिक असल्याचा पुरावा :-**

माजी सैनिकासाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेवू इच्छिणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - सहा** मध्ये दिलेल्या नमुन्यांत (लागु असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(फ) **महिला आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा :-**

अमागास महिलांसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - पाच** मध्ये दिलेल्या नमून्यात सक्षम प्राधिका-यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(ग) **खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा** :-

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी आरक्षित पदावर दावा करणा-या उमेदवारांनी सोबतच्या **परिशिष्ट - सात ते परिशिष्ट - दहा** मध्ये नमूद केलेल्या नमुन्यांत (लागु असेल त्याप्रमाणे) सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(ह) विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा :-**

विवाहित स्त्रियांना विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नांवात बदल झाल्यासंबंधी अधिसुचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नांवात बदल झाल्यासंबंधीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**(ई) लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र :-**

सोबतच्या **परिशिष्ट - अकरा** मधील विहित नमुन्यानुसार प्रतिज्ञापत्र स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक आहे.

४.० **महत्वाची सुचना :-**

(१) आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतीही अनावश्यक व अतिरिक्त कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करु नयेत.

(२) गुणपत्रिका अथवा सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रांच्या पाठीमागील मजकुर सुध्दा निरपवादपणे (Invariably) छायांकित (Copied) केला पाहिजे.

(३) प्रमाणपत्र इंग्रजी अथवा मराठी व्यतिरिक्त इतर भाषेत असतील तर त्यांच्या छायांकित प्रतीसोबत अधिकृत भाषांतर(Authentic Translation) जोडणे आवश्यक आहे.

(४) अर्जातील दाव्याच्या पुष्ट्यर्थ संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.

(५) पात्रता / सवलती संदर्भात अर्जामध्ये निरपवादपणे दावा केलेला असणे (Claimed) आवश्यक आहे. अर्जामध्ये केलेल्या प्रत्येक दाव्याच्या पृष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/ सवलत देय होणार नाही. अथवा उमेदवारी अंतिम समजण्यात येणार नाही.

(६) एफडीसीएम लिमिटेडला सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खोडाखोड केलेली, अवैद्य, नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिका-याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास एफडीसीएम लिमिटेड मार्फत घेण्यात येणा-या सर्व परीक्षा व निवडीपासून उमेदवारास कायमस्वरुपी प्रतिरोधीत करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. तसेच इतरही कायदे / नियमांनुसार कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(७) मुलाखतीच्या दिवशी उपरोक्त सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. ती सादर करु शकत नसेल तर त्यास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही व मुलाखत घेतली जाणार नाही. या कारणामुळे उमेदवार अपात्र ठरत असेल, तर संबंधित परीक्षेची उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच, याची संगणकीय प्रणालीद्वारे नोंद घेण्यात येईल. अशा बाबतीत प्रकरणपरत्वे उमेदवारास ब्लॅक लिस्ट करण्याची अथवा एफडीसीएम लिमिटेड च्या निवड प्रक्रियेतून कायमचे प्रतिरोधीत करण्याची कार्यवाही होवु शकते. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

## ५.० <u>किमान अर्हता :-</u>

**(१)** अर्ज करणा-या सर्व उमेदवारांनी जाहिरातीमधील सर्व तरतुदी व अटीची पूर्तता करणे आवश्यक असून याबाबत स्वत:ची खातरजमा व आवश्यक ती प्रमाणपत्रे प्राप्त करणे आवश्यक आहे.

**(२)** पात्रतेबाबत केलेल्या कोणत्याही दाव्याची दखल घेण्यात येणार नाही.

**(३)** अर्जामध्ये केलेल्या विविध प्रकारच्या दाव्यांस अनुसरुन उमेदवार पदाच्या विहित अर्हतेबाबतच्या अटिंची पूर्तता करीत आहे, असे गृहित धरुन व ही बाब मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्राच्या आधारे तपासण्याच्या अधिन राहून उमेदवारास केवळ तात्पुरत्या स्वरुपात परिक्षेस प्रवेश देण्यात येईल अथवा मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

**(४)** केवळ परीक्षेकरीता प्रवेशपत्र डावुनलोड केलेले आहे म्हणून एफडीसीएम लिमिटेडने संबंधिताची उमेदवारी अंतिमत: पक्की केली असा अर्थ होत नाही व संबंधितांची मुलाखत घेण्यात येईलच असेही नाही.

**(५)** विहित अर्हता किमान आवश्यक अर्हता असून ती धारण करणा-या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी अथवा मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल असेही नाही.

**(६)** अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवारास लेखी परीक्षेच्या प्रवेशासाठी अथवा मुलाखतीसाठी तात्पुरते पात्र समजण्यात येईल. मुलाखतीच्या अगोदर अर्जामध्ये दिलेली पात्रतेविषयक माहिती मुळ कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल व त्याच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र आढळून आल्यानंतरच उमेदवारास मुलाखतीची संधी देण्यात येईल. अन्यथा त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**(७)** एफडीसीएम लि.ने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी उमेदवारास परीक्षा, शारिरिक क्षमता व तपासणी करिता तसेच मुलाखतीसाठी उपस्थित रहावे लागेल.

**(८)** अर्ज सादर करतांना केलेला जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडू दावा इत्यादी बाबींमध्ये तद्नंतर कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. यास्तव एफडीसीएम कडे अर्ज सादर करतांना जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडूचा दावा अचूक दर्शविला आहे, याची खात्री करुन घ्यावी. अर्ज करतांना जातीचे अथवा क्रिमी लेअर, माजी सैनिक, खेळाडूचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याची सबब सांगून त्यानंतर अर्जातील माहितीमध्ये बदल करण्याची विनंती केल्यास ती कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.

## ६.० <u>गुणांची सीमारेषा</u> :-

(१) एफडीसीएम लिमिटेड कडून गुणांची सीमारेषा (Cut off line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा निश्चित करतांना किमान गुणवत्ता राखण्याच्या दृष्टिने गुणांची किमान टक्केवारी राखण्यात येईल.

(२) एफडीसीएम लिमिटेड कडून संबंधित परीक्षेच्या गुणांची सीमारेखा (Cut off line) निश्चित केल्यानंतर एफडीसीएम लि. व महाऑनलाईन च्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
(३) गुणांचे सीमारेषे संदर्भात प्राप्त होणा-या कोणत्याही अभिवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

७.० <u>मुलाखत</u> :-

(१) लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखतीच्या अगोदर अर्जामध्ये दिलेली पात्रताविषयक माहिती मुळ कागदपत्रांच्या / प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यांत येईल. अर्जातील दाव्यानुसार मुळ कागदपत्रे सादर करणा-या व मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. विहित कागदपत्रे सादर करु न शकणा-या अथवा मुलाखतीसाठी अर्हता प्राप्त न ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच या करीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(२) उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते अजमावणे हा मुलाखतीचा उद्देश असतो. मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नाबरोबरच सहाय्यक व्यवस्थापक/वनक्षेत्रपाल पदासाठी अर्ज केलेल्या पदाची कर्तव्ये व जबाबदा-या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी, ग्रामीण क्षेत्रांच्या स्थितीबाबत त्याला असलेली माहिती आणि ग्रामीण जनतेच्या समस्या अन्य घडामोडी तसेच सामान्य ज्ञान इत्यादी संबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असतो.

(३) मुलाखत ५० गुणांची असेल तसेच मुलाखतीमध्ये किमान ४०% पेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवाराचाच विचार करण्यात येईल.

(४) मुलाखत घेतलेल्या पुरुष उमेदवारांची ४ तासात २५ कि.मी. व महिला उमेदवारांची ४ तासात १६ कि.मी. पायी चालण्याची चाचणी घेतली जाईल. ही चाचणी सहाय्यक व्यवस्थापक/ वनक्षेत्रपालांच्या नियुक्ती करीता अनिवार्य असून एफडीसीएम लि. ने ठरवुन दिलेल्या ठिकाणी ही चाचणी घेतली जाईल. या चाचणी संबंधी हमी प्रमाणपत्र /वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र चाचणी सुरु होण्यापूर्वी द्यावी लागेल. हमी प्रमाणपत्र /वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र दिले नसल्यास त्यांची चाचणी घेतील जाणार नाही.

८.० <u>प्रवास खर्च</u> :-

**(१)** परीक्षेसाठी /मुलाखतीसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय नाही.
**(२)** मुलाखतीसाठी बोलाविण्यांत आलेल्या तसेच शारिरिक क्षमता चाचणी व शारिरिक तपासणीसाठी उमेदवारांनी स्वखर्चाने हजर होणे आवश्यक आहे.

९.०. <u>गुणपत्रिका</u> :-

परिक्षा व मुलाखतीचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

१०.० <u>आरक्षण :-</u>

<u>मागासवर्गाचे आरक्षण</u> :-

(१) मागासवर्गाचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

(२) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र.,व इ.मा.व.या मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतूदी शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक सीवीसी-१०९४/प्रक्र-८६/मावक-५, दिनांक १६ जून १९९४ नुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या आदेशानुसार राहील.

(३) जातीच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्याकडुन पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या आदेशानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१६९६/प्रग्र-३४/का-१०, दिनांक ७ मार्च १९९६ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(५) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्रक्र-१२०/मावक-५ दिनांक १ नोव्हेंबर २००१ तसेच शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-१०/२००६/प्रक्र-१५/मावक-५ दिनांक ३० जून २००६ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(६) महिला उमेदवारांच्या बाबतीत शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००४/प्रक्र-६८७/मावक-५ दिनांक २९ ऑक्टोंबर २००४ मधील आदेशानुसार व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली विवाहापूर्वीचे नांव अंतर्भूत असलेली क्रिमिलेअर मध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

(७) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक एसटीसी-१६९६/प्रग्र-३४/का-१०, दिनांक ७ मार्च १९९६ नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना तसेच, शासन निर्णय,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००१/प्रक्र-१२०/मावक-५ दिनांक १ नोव्हेंबर २००१ नुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी, तसेच ज्या जातींना उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते, असे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी खाली नमूद केलेल्या अधिका-यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे :- (एक) सबंधित उप विभागीय अधिकारी (महसूल) (दोन) उपजिल्हाधिकारी किंवा (तिन) जिल्हाधिकारी उपरोक्त सक्षम प्राधिका-यांनी जातीच्या प्रमाणपत्रावर अन्य कोणताही शिक्का न मारता उपविभागीय अधिकारी (महसूल) उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी असा शिक्का मारुन जातीचे प्रमाणपत्र निर्गमित केले असणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्रकारे निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध समजले जाणार नाही.

(८) शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०९६/प्रक्र-४८/मावक-५ दिनांक १३ सप्टेंबर १९९६ नुसार व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या आदेशानुसार तालुका दंडाधिकारी यांनी प्रदान केलेले जाती विषयक प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

(९) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक्र-८६/मावक-५ दिनांक २२ नोव्हेंबर १९९५ तसेच शासन पत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्रक्र-१६२/मावक-५ दिनांक १८ एप्रिल २००६ मधील आदेशानुसार व तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या आदेशानुसार ज्या व्यक्तीच्या नांवे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमीलेअर मध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नांवाने सर्वसाधारण रहिवास प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.

(१०) महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरीत मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय समाज कल्याण,, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०८५/प्रक्र-८६/२६३०४/(२१९९)/बीसीडब्ल्यु-५ दिनांक ६ ऑक्टोंबर १९८६ मधील आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

**११.० जातीच्या दाखल्यामध्ये पुढील बाबी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे :-**

(१) जात स्पष्टपणे लिहिलेली असावी, ती संक्षेपात्मक असू नये.
(२) जातीचे वर्गीकरण जसे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग स्पष्टपणे नमूद करावे.
(३) जातीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात असावे.
(४) प्रमाणपत्रामध्ये ज्या शासकीय आदेशान्वये ती जात मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्यात आली असेल त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक नमूद असावा आणि ती व्यक्ती सक्षम प्राधिका-याच्या कार्यक्षेत्रात सर्वसाधारण रहिवासी असल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.
(५) मागासवर्गीय उमेदवारांनी ते महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र स्वत:च्याच नांवाने सादर करणे आवश्यक आहे.
(६) जातीच्या प्रमाणपत्रात उमेदवार आणि त्यांचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात सर्वसाधारण वास्तव्य (Ordinarily Reside(s)) असल्याची तरतूद करण्यात आली असेल तर अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याबाबतचा दाखला सादर करणे उमेदवारांस सर्वसाधारणपणे बंधनकारक राहणार नाही. भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० नुसार सर्वसाधारण वास्तव्याचा अर्थ लावला जाईल.
(७) मागासवर्गातील असल्याचा दावा सांगणा-या उमेदवारांच्या बाबतीत विहित नमुन्यातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती (आवश्यक प्रमाणपत्राचे नमुने परिशिष्टामध्ये दिले आहेत) मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
(८) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील. असे न केल्यास आणि विहित प्रमाणपत्राच्या प्रती न जोडल्यास अशा उमेदवारांचा विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग किंवा इतर मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

**१२.० महिलांसाठीचे आरक्षण :-**

(१) महिलासाठी असलेले आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.
(२) महिलांच्या आरक्षित पदांच्या लाभाकरिता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.
(३) महिलांचे आरक्षण हे त्या त्या प्रवर्गासाठी समांतर राहील. तथापि, भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलाकरिता आरक्षित पदासाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारामार्फत भरण्यात येईल.
(४) खुल्या संवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागेवर नियुक्तीकरिता त्या संवर्गातील योग्य महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा अराखीव समजण्यात येतील.
(५) खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.
(६) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअर प्रवर्गातील महिला नसल्याचे अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.
(७) खुल्या प्रवर्गातील महिलां उन्नत व प्रगत व्यक्ती / गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचा प्रमाणपत्राचा नमुना सोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेला आहे.
(८) मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील महिला उमेदवार खुल्या प्रवर्गातील जागाकरिता विकल्प देतील किंवा विकल्प न देताही मागासवर्गीयांच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित पदावर झाल्यास, अशा महिला उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करण्याबाबत खालील दोन विकल्प राहतील :-
(अ)सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग अथवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांनी विहित केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधित जातीची प्रमाणपत्रे (क्रिमीलेअर प्रमाणपत्रासह) सादर करवीत. अशा महिला उमंदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता विहित केलेले क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही.

(ब) संबंधित जातीचे विहित प्रमाणपत्र सादर करु इच्छित नसणा-या किंवा सादर करु न शकलेल्या महिला उमंदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच परिशिष्ट पाच नुसार विहित केलेले उन्नत व्यक्ति / गट (क्रिमी लेअर) मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१३.० अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण :-**

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे आरक्षण,त्यासाठी मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार इत्यादि संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**१४.० लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र :-**

(१) शासनाने शासकीय विभागातील गट -ब मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विहित करणारे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसुचनेव्दारे पारित केले आहे. या नियमातील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीसाठी सोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या नमुन्यानुसार विहित केलेल्या नमुन्यातील प्रतिज्ञापन (परिशिष्ट ११) मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

(२) प्रतिज्ञापत्रात अनुक्रमांक ३ येथे नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

(३) या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंब याचा अर्थ दोन अपत्ये यासह पत्नी व पती असा आहे.

**१५.० संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान :-**

महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम १९९९ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी आवश्यक ठरविलेली संगणक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**१६. सर्वसाधारण :**

(१) एफडीसीएम लिमी. कडे अर्ज सादर केल्यानंतर अर्जात केलेल्या दाव्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(२) सर्व परीक्षांची उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका ही एफडीसीएम लिमी. ची मालमत्ता असून अनधिकृतपणे हाताळणाऱ्या अथवा जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर प्रचलित कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(३) एफडीसीएम लिमी. कडे अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तीभंगविषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, एफडीसीएम लि. ला वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. एफडीसीएम लि. कडे अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल एफडीसीएम लि. ला न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी एफडीसीएम लि. कडून रद्द करण्यात येईल.

(४) एफडीसीएम लि.ने कोणत्याही कारणास्तव प्रतिरोधीत केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास प्रतिरोधनाचा कालावधी संपुष्टात येत असेल तरच अशा उमेदवाराने अर्ज करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच, याबाबत उमेदवारास काहीही कळविले जाणार नाही अथवा यासंदर्भात केलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही.

(५) सार्वजनिक सेवेत उमेदवार योग्य आहे, असे सर्व चौकशीनंतर आढळून आले, तरच नेमणूक करण्यात येते.

(६) अंतिम निकालानंतरचा सर्व पत्रव्यवहार एफडीसीएम लि. कडे करावा.

(७) नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना वैद्यकीय मंडळ/शासकीय रुग्णालय, नागपूर कडून वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल. सदर मंडळाकडुन आपण शारीरिक व मानसिकदृष्ट्या शासकीय सेवेस पात्र असल्याचे प्रमाणित झाल्यानंतरच संबंधित सेवेसाठी नियुक्ती केली जाते.

(८) एकापेक्षा अधिक पत्नी हयात असणाऱ्या कोणताही पुरुष महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेतील नियुक्तीस पात्र असणार नाही. मात्र अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीला हा निर्बंध लागू करण्यापासून सूट देण्यास विशेष कारणे आहेत, अशी एफडीसीएम लि. ची खात्री पटल्यानंतर अशी सूट देण्यात येईल.

(९) नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांना एफडीसीएम लिमी. च्या सर्वसाधारण शर्तीनुसार किंवा विहित केलेले करारपत्र / बंधपत्र / वचनपत्र इत्यादी विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय त्यांना नियुक्ती दिली जाणार नाही.

(१०) एफडीसीएम लिमिटेडने वेळोवेळी घतलेले निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहतील.

(११) **सहाय्यक व्यवस्थापक/वनपरीक्षेत्र अधिकारी** या पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना वनशास्त्र प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणा करिता पाठविण्यात येईल. सदर प्रशिक्षणाचा खर्च एफडीसीएम लिमिटेड कडून करण्यात येईल. तसे वैयक्तिक बंधपत्र दोन जामीनदारांसह द्यावे लागेल. वैयक्तिक अटी व शर्तीची पूर्तता न करणाऱ्या किंवा गैरवर्तनाच्या कारणास्तव अयोग्य असल्याचे आढळणाऱ्या उमेदवारास एफडीसीएम लिमिटेडने प्रशिक्षणासाठी खर्च केलेली सर्व रक्कम एफडीसीएम लिमिटेडने ठरविलेल्या व्याज दराने परत करावी लागेल.

(१२) निवड झालेल्या उमेदवारांना केंद्र शासनाने निश्चित करुन दिलेल्या प्रशिक्षण महाविद्यालयातील दोन/दिड वर्षाचे विहित केलेले प्रशिक्षण घ्यावे लागेल. समाधानकारक प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व्यक्तींनाच एफडीसीएम लि. मध्ये सहाय्यक व्यवस्थापक/ वनपरीक्षेत्र अधिकारी या पदावर सामावून घेतले जाईल. अन्यथा त्यांची निवड रद्द केली जाईल.

(१३) परिविक्षा कालावधीतील वेतन :-प्रशिक्षण संस्थेने ठरवुन दिल्याप्रमाणे (वेतन दिले जात नसल्यास)

(१४) बढतीची संधी - जेष्ठता व पात्रतेनुसार एफडीसीएम लिमिटेडच्या वरीष्ठ पदावर.

(१५) नियुक्तीचे ठिकाण - महाराष्ट्रात एफडीसीएम लिमिटेडचे कार्यक्षेत्रात कोठेही.

**सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

(१६) विहित नियमानुसार विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(१७) एफडीसीएम लि. चे सेवेत नियुक्ती होताच त्यांना भविष्य निर्वाह निधी कायद्याअंतर्गत निवृत्ती वेतन लागू ठरेल.

(१८) एफडीसीएम लि. चे अध्यक्ष, संचालक किंवा अधिकारी यांच्यावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण आणण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास अशा उमेदवाराला निवडीपासून अपात्र ठरविण्यात येइल.

(१९) उमेदवारीच्या संदर्भात उमेदवाराव्यतिरीक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून आलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. अशी पत्रे परस्पर दफ्तर दाखल करण्यात येतील.

(२०) आपण एफडीसीएम लि. चे कर्मचारी आहोत, एफडीसीएम लि. शी संबंधित आहोत,त्यामुळे एफडीसीएम लि. मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत, मुलाखतीत आपल्या निवडीसाठी मदत करण्याची हमी / माहिती देणाऱ्या व्यक्तीवर उमेदवाराने विश्वास ठेवू नये. एफडीसीएम लि. मध्ये होणारी निवड नियमाप्रमाणे व गुणवत्तेच्या आधारे केली जाते. आपल्या निवडीबाबत कोणत्याही प्रकारची आमिषे / आश्वासने यापासून अर्जदाराने दूर राहणे अगत्याचे व अर्जदारांच्या हिताचे आहे.

(२१) एफडीसीएम लि. कडे अर्ज केल्यानंतर सदर पदाची मुलाखत / परीक्षा केव्हा होणार, याबाबत उमेदवाराने सतर्क राहणे आवश्यक आहे. परीक्षा / मुलाखत झाल्यानंतर यासंदर्भातील कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

(२२) परीक्षेच्या वेळी परीक्षा-कक्षात किंवा पीरक्षा-केंद्राच्या परिसरात, तसेच शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी एफडीसीएम लि. च्या कार्यालयात किंवा परिसरात भ्रमणध्वनी (मोबाईल फोन), पेजर अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणारा उमेदवार कारवाईस पात्र ठरेल.

(२३) परीक्षेकरिता अथवा अभ्यासक्रमाच्या संदर्भात एफडीसीएम लि. कडून कोणत्याही प्रकारचे संदर्भपुस्तक पुरविण्यात येत नाही. त्यामुळे अशा स्वरुपाच्या कोणत्याही चौकशीची दखल घेण्यात येणार नाही व अशा चौकशीच्या संदर्भातील पत्रे कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दफ्तरी दाखल करण्यात येतील.

(२४) एफडीसीएम लि. कडे केलेल्या अर्जास अनुसरुन आवश्यक भासल्यास त्याची माहिती कळविण्यात येईल. अथवा वेबसाईट / वृत्तपत्रांमधून प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षा योजनेतील तरतुदीनुसार परिक्षांचे गुण उमेदवारांना कळवावयाचे नाहीत, असे गुण मुलाखतीचे स्वत:चे अथवा इतरांचे गुण, इतर उमेदवारांची माहिती, अर्जाच्या प्रती, कार्यवृत्त, निवडीसंदर्भातील संवेदनशील कागदपत्रे जसे उत्तरपत्रिका / उत्तरपुस्तिका, गुणपत्रके, शेरे, टिप्पण्या, अभिप्राय, पत्रव्यवहाराच्या प्रती, तज्ञ / समिती सदस्यांची माहिती, प्रमाणपत्राच्या प्रती, इत्यादी कोणत्याही कारणास्तव पुरविण्यात येणार नाहीत.

(२५) एफडीसीएम लि. ला सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेख ही एफडीसीएम लि. च्या अभिलेखाचा भाग होतील व ती गोपनीय मानली जातील.

१७.० वर दिलेल्या सूचना व वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकारी व्यवस्थापकीय संचालकांना राहिल.

स्वाक्षरीत
व्यवस्थापकीय संचालक